RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ११८(३)] गुरूवार, ऑगस्ट २१, २०२५/श्रावण ३०, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २९८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नगरविकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.**

क्रमांक एमआरडी-३३२५/प्र.क्र.१२३/नवि-७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्र. एमआरडी-३३२३/प्र.क्र.१३१/नवि-७, अन्वये महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, (LXV of १९५८) च्या कलम २० चे पोट-कलम (१-अ), (१-ब), (१-क), (१-ड), आणि (१-इ), द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याला समर्थनीय करणाऱ्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाद्वारे अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूमार्गाच्या भागातून व त्याचे पोच रस्ते यांचा वापर करणाऱ्या मोटार वाहनांवर उक्त अधिसूचनेच्या अनुसूची-१ च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या मोटार वाहनांवर आणि वाहनांकडून ओढून नेल्या जाणाऱ्या अनुयानांवर वाहन प्रकारानुसार उक्त अनुसूची-१ च्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने १ फेब्रुवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीसाठी उक्त अधिसूचनेच्या अनुसूची-२ च्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या खालील पथकर संकलन केंद्रांवर (टोल नाक्यांवर) पथकर (टोल) आकारण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक २३ मे २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णय गृह विभाग क्र. एमव्हीआर-०१२५/प्र.क्र.१३/परि-२ अन्वये महाराष्ट्र शासनाने लोकहितासाठी वर नमूद केलेल्या शासन निर्णयामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इलेक्ट्रिक चारचाकी वाहने (परिवहन व परिवहनेत्तर वाहने) (M१), इलेक्ट्रिक बसेस (M३, M४) (राज्य परिवहन उपक्रम-STU), इलेक्ट्रिक बसेस (M३, M४) (खाजगी, राज्य / शहरी परिवहन उपक्रम) या प्रकारच्या वाहनांना वर नमूद केलेल्या मार्गांवर पथकर माफी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

आता त्याअर्थी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम याच्या कलम २० ची पोट-कलम (१-इ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंबंधात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्र. एमआरडी-३३२३/प्र.क्र.१३१/नवि-७, दि.३१ जानेवारी, २०२५ च्या अधिसूचनेमध्ये अंशतः दुरुस्ती करून उक्त शासन निर्णयामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इलेक्ट्रिक चारचाकी वाहने (परिवहनेत्तर) (M१), इलेक्ट्रिक चारचाकी वाहने (परिवहन) (M१), इलेक्ट्रिक बसेस (M३, M४) (राज्य परिवहन उपक्रम-STU), इलेक्ट्रिक बसेस (M३, M४) (खाजगी, राज्य / शहरी परिवहन उपक्रम) या प्रकारच्या वाहनांना वर नमूद केलेल्या मार्गांवरील (१) शिवाजीनगर आणि (२) गव्हाण या पथकर संकलन केंद्रांवर (टोल नाक्यांवर) दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ पासून पथकर माफी करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय चौधरी,**
शासनाचे सहसचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madan Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st August, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLE TAX ACT, 1958.

No. MRD-3325/C.R.123/UD-7.—Whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Urban Development Department, No. MRD-3323/CR131/UD-7, dated the 31st January 2025, issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1-A*), (*1-B*), (*1-C*), (*1-D*) and (*1-E*) of sections 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), levied toll on the classes of motor vehicles specified in column (2) of the Schedule-I appended to the said notifications and on the trailers drawn by such vehicles, passing over the section Atal Bihari Vajpayee Sewri-Nhava Sheva Atal Setu and also approach roads thereto, at the specified against each of the said vehicles into column (3) of the said Schedule-I, with effect from the 1st February 2025 to 31st December 2025 at the following toll collection centers specified in column (2) of the Schedule-II appended to the said notification ;

And whereas, *vide* Government Resolution, Home Department, No. MVR-0125/C.R.13/Tra-2, dated 23rd May, 2025, the Government of Maharashtra in the public interest, decided to exempt the e-4W cars (M1)(Transport and Non-Transport vehicle), e-buses (M3, M4)(STU), e-buses (M3, M4) (Non STU) mentioned in the scheduled appended to the said notification passing over the said road, from the levy of toll.

Now, therefore in exercise of the powers conferred by sub-section (*1-E*) of section 20 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act, the Government of Maharashtra hereby, in partial modification of the Government Notification, Urban Development Department, No.MRD-3323/C.R.131/UD-7, dated the 31st January, 2025, exempts the e-4W cars (M1)(Transport and Non-Transport vehicle), e-buses (M3, M4)(STU), e-buses (M3, M4) (Non STU) mentioned in the scheduled appended to the said notification passing over the said road from the payment of toll collection center at (1) Shivaji Nagar and (2) Gavan ; on the above mentioned road with effect from 21st August, 2025.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY CHAUDHARI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.